# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २३.१२.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. २२/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४१२ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,१४,५००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. २२/१२/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०३ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ४,६७०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २२/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०९ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**ई सी ॲक्ट सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. २२/१२/२०२२ रोजी फिर्यादी धनंजय उत्तमराव पुजारी वय ३६ व्य.नौकरी,ने दहशतवाद विरोधी शाखा हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे कुरूंदा येथे कलम भादवी कलम ३२८,२७२,२७३,१८८,सह कलम २६(२)(पअ),२६(३)(डि),३०(२)(अ) व शिक्षा पात्र कलम ५९ अन्न सुरक्षा कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन यातील आरोपीने वर नमुद वर्णनाच्या मुदेमाल हा लोकांच्या जिवीतास हनीकारक व शारीरासाठी विषद्रव्य असलेला शासनाने प्रतिबंधीत केलेला वरील वर्णनाचा सुंगधीत पान मसाला किमती ३३०२० रू चा माल चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने साठवणुक करून विक्री करीत असतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे व पुढील तपास कुरूंदा पोलीस करित आहेत.

**अपघात गुन्हे:—**

दि. २२/१२/२०२२ रोजी पोस्टे हिंगोली ग्रा येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील नमुद फिर्यादी व त्याचा मुलगा प्रसाद वय १६ वर्ष असे हिंगोली ते औढा ना रोडवर रोडच्या डाव्या बाजुने ए.बी.एम इंग्लिश स्कुल लिंबाळा मक्त हिंगोली येथे जात असतांना मोटार सायकल चालकाने त्यांच्या ताब्यातील मोटार सायकल निष्काळजीपणे हयगईने भरधाव वेगात चालवुन फिर्यादीचा मुलगा प्रसाद यास जोराची धडक देवुन रोडवर खाली पडल्याने डोक्याला मार लागुन जखमी करण्यास कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली पोलीस पोलीस तपास करित आहेत.